मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय

जिल्हा परिषद, चंद्रपूर

(सामान्य प्रशासन विभाग)

दूरध्वनी क्रमांक ०७१७२-२५५५९२ ई-मेल : dyceogzpchandrapur@gmail.com

क्रमांक: जिपचं/साप्रवि/लिगल सेल/९२८/२०२६ दिनांक: ०३/११/ २०२६

याद्वारे जिल्हा परिषद, चंद्रपूर स्तरावरील न्यायालयीन कामकाजासाठी विधी अधिकारी हे पद कंत्राटी पद्धतीने ११ महिन्याच्या कालावधीच्या मर्यादेत भरावयाचे असून त्याकरीता जाहिरात क्रमांक ०१/२०२६ नूसार विधी अधिकारी (कंत्राटी) या पदाकरीता अर्ज सादर करण्याचा कालावधी दिनांक ०३/११/२०२६ पासून ते दिनांक २३/११/२०२६ रोजी सायंकाळी ५.४५ वाजपर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे.

पदाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

(१) पदाचे नाव :- विधी अधिकारी (कंत्राटी) -०१ (एक पद)

(२) कामाचे स्वरुप:-

१) जिल्हा परिषद, चंद्रपूर स्तरावरील सर्व न्यायालयीन प्रकरणात परिच्छेदनिहाय अहवाल तयार करणे, शपथपत्र तयार करणे, इत्यादि तसेच न्यायालयीन प्रकरणांचा पाठपुरावा करुन शासनाची बाजु प्रभावीपणे मांडण्यासाठी जिल्हा परिषद, चंद्रपूर चे पॅनलवरील अधिवक्ते यांना सहाय्य करणे.

२) कार्यालयाकडे प्राप्त होणा-या सर्व प्रकारच्या कायदेविषयक प्रकरणात / न्यायालयीन प्रकरणात सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

३) वर्ग-३ व वर्ग-४ च्या आस्थापनेवरील न्यायालयीन प्रकरणे / परिच्छेदनिहाय अभिप्राय (Parawise Comments) तयार करणे. सेवाविषयक/प्रशासकीय बाबी/ विभागीय चौकशी इत्यादि. तथा समकालीन कायदयाची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती हाताळणे.

४) प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी अधिवक्त्याकडे पठपुरावा करणे. जेथे शासन प्रतिवादी आहे अश्या प्रकरणी सादर करावयाचे प्रतिज्ञापत्र संबंधीत अधिका- यांच्या मदतीने तयार करणे.

५) शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यात सक्षम प्राधिका-याची मान्यता घेवून विहित मुदतीत सादर होईल याची दक्षता घेणे.

६) जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे. अश्या प्रकरणांमध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन तद्अनुषंगाने अपिल दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

७) अपिल करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपिलाचा मसुदा तयार करणे व संबंधीत शासकीय अधिवक्त्याकडे पाठविणे व अपिलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.

८) सर्व न्यायालयीन प्रकरणांसाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर "नोडल अधिकारी" म्हणुन काम पाहणे. विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमूण दिलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे.

९) जिल्हा परिषद, चंद्रपूर अंतर्गत सर्व विभागाचा न्यायालयीन प्रकरणाचा एकत्रित संकलीत सविस्तर अहवाल तयार करुन अद्यावत ठेवणे

(३) शैक्षणिक अर्हता:- १) उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापिठातील कायदयाच्या अभ्यासक्रमात पदवीधर असावा. तसेच Constitutional किंवा Administrative या विषयात पदव्युत्तर असल्यास प्राधान्य असेल व उमेदवार सनद धारक असावा.

(४) अनुभव:- १) विधी अधिकारी (कंत्राटी) या पदासाठी मा. उच्च न्यायालय व इतर न्यायालयातील विधी कामकाजाचा वकिली व्यवसायाचा किमान ७ वर्षाचा अनुभव (वकालतनामा अथवा शपथपत्रासह ७ वर्षाचे) असणे आवश्यक राहिल.

(५) मानधन:- एकत्रित मानधन प्रतिमाह रुपये ३०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त) व बाहेर जिल्हयातील न्यायालयात कामकाजासाठी प्रवास करावयाचा झाल्यास प्रवास खर्च शासकीय कर्मचा-यांना देय असलेल्या प्रवास भत्याच्या दरानुसार देय राहील.

२३.०९.२१

(पुलकित सिंह, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, चंद्रपूर

अटी व शर्ती :-

१. विधी अधिकारी (कंत्राटी) या पदाची नेमणूक ही पुर्णत: कंत्राटी स्वरुपाची असेल ही नियुक्ती न्यायालयीन प्रकरणाची देखरेख करण्यासाठी जिल्हा परिषद, चंद्रपूर व पंचायत समिती कार्यालयातील मा. न्यायालयीन प्रकरणी कायदेशीर सल्ला देण्याकरीता भरण्यात येत असल्याने सदर कंत्राटी विधी अधिकारी शासकीय कर्मचारी म्हणुन गणल्या जाणार नाहीत. तसेच याबाबत भविष्यात तसा दावाही करता येणार नाही.

२. विधी अधिकारी (कंत्राटी) या पदाची नेमणूक करार पद्धतीने प्रथमत: ११ महिन्यासाठी करण्यात येईल ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी वाढविता येईल. तथापी अशी मुदत वाढविताना एकावेळी ही मुदत ११ महिन्यापेक्षा अधिक कालावधीसाठी असणार नाही. अशा प्रकारे जास्तीत जास्त तीन वेळा नियुक्ती करता येईल. त्यानंतर पुन:श्च नियुक्ती करावयाची असल्यास निवड प्रक्रियेला सामोरे जावे लागेल.

३. नियुक्तीच्या वेळी रुपये ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर जिल्हा परिषद समवेत बंधपत्र करार करावा लागेल.

४. करार पद्धतीने नेमणूक करण्यात आल्यानंतर एकत्रित मानधन व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाही.

५. विधी अधिकारी (कंत्राटी) यांना कार्यालयीन वेळेत (सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५) वाजेपर्यंत जिल्हा परिषद कार्यालयात पुर्णवेळ उपस्थित राहावे लागेल.

६. विधी अधिकारी (कंत्राटी) यांची इतर शासकीय कार्यालयात विधीतज्ञ म्हणुन नेमणूक झालेली नसावी.

७. विधी अधिकारी (कंत्राटी) या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्ती वेळी ४५ वर्षापेक्षा जास्त नसावी.

८. जिल्हा परिषद कार्यालयातील कामकाजाबाबतच्या गोपनियतेचा भंग होता कामा नये.

९. विधी अधिकारी (कंत्राटी) यांची नियुक्ती झाल्यानंतर त्यांना मा. न्यायालयात खाजगी नोरकी/व्यवसाय व इतर संस्थेत अथवा कार्यालयात काम करता येणार नाही.

१०. मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक राहिल.

११. संगणक अर्हता (MS CIT तथा तत्सम) परिक्षा प्रमाणपत्र उत्तीर्ण असणे आवश्यक राहिल.

१२. उमेदवारांना आस्थापनेविषयक, सेवाविषयक, प्रशासकीय अश्या सर्व प्रकारच्या कायदयाची स्थिती तथा विभागीय चौकशी इत्यादी बाबत ज्ञान असणे आवश्यक राहील.

१३. विधी अधिकारी (कंत्राटी) या पदासाठी उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक राहील.

१४. जरुरी वाटल्यास किंवा काम असमाधानकारक असल्याचे वाटल्यास कोणत्याही वेळी ११ महिन्याचा कालावधी पुर्ण होण्यापुर्वी नियुक्ती रद्द करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहतील.

जिल्हा परिषद, चंद्रपूर कार्यालय, सामान्य प्रशासन विभाग येथे उमेदवाराचे प्राविण्य पडताळणी साठी आवश्यक वाटल्यास लेखी चाचणी अथवा प्रत्यक्ष मुलाखत (तोंडी) घेण्यात येईल. आवश्यक सुचना zpchandrapur.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर व कार्यालयाचे सुचना फलकावर देखील उपलब्ध आहे.

23.01.21

(पुलकित सिंह, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, चंद्रपूर